हॅरोल्ड, क्रेयॉन आणि प्राणी



क्रॉकेट जॉन्सन

मराठी: अश्विनी बर्वे




हॅरोल्डला रात्री झोप येत नव्हती.
म्हणून त्याने आपले कापूस भरून
तयार केलेले प्राणी बाहेर काढले.






हॅरोल्डने विचार केला प्राणी असणे
किती मजेदार असेल ना?

मला कोणता प्राणी व्हायला आवडेल बरं?



हॅरोल्डला प्राण्यांच्या
बद्दल अधिक जाणून
घेण्याची इच्छा होती.


त्याने स्वतःचे क्रेयॉन्सकाढले
आणि एका रोमांचक प्रवासाला
सुरुवात झाली.






हॅरोल्डने विचार केला की त्याला खूप मोठे
आणि शक्तिशाली व्हायला आवडेल.
म्हणून त्याने हत्तीचे चित्र काढले..

हत्तीने आपली सोंड
पाण्याच्या बादलीमध्ये बुडवली.
आणि त्याने चारी बाजूला पाणी फवारले.



हॅरोल्डला ते खूप मजेशीर वाटले.
मग त्याने एक नळी घेतली आणि
त्याने पाणी हत्तीवर फवारले.

हत्ती पूर्ण ओला झाला.
दयाळू ओले होय गेलो.
हॅरोल्ड हत्तीची क्षमा मागण्यासाठी गेला
पण हत्ती तिथून निघून गेला.



मला दूरवर प्रवास करायला
आवडेल असा त्याने विचार केला
आणि म्हणून त्याने उंट काढला.

नंतर हॅरोल्डने भरपूर पदार्थांनी आणि
पाण्याने भरलेली मोठी बॅकपॅकचे चित्र काढले.
मग तो आणि उंट प्रवासाला निघाले.



हेरॉल्ड चालत होता, त्याला त्याची पिशवी
खूप जड वाटत होती.
तो दमला होता.

सूर्य तळपत होता.
मग हॅरोल्डने एक तळं
आणि पामचे झाड काढलं.



जेव्हा हॅरोल्ड विश्रांती घेत होता तेव्हा चित्ताचा कळप वेगाने धावत होता. तेव्हा हेरॉल्डने विचार केला मला सुद्धा वेगात जायचं आहे.



मग हॅरोल्डने रोलर स्केट्सच्या एका जोडीचे चित्र काढले आणि तो चित्ताच्या मागे धावू लागला.



चित्त्याबरोबर शर्यत लावायला मजा येत होती. पण लवकरच हेरॉल्ड गरम झाला आणि त्याला कुठेतरी थंड ठिकाणी जावं वाटत होतं.

हॅराल्डने आपला क्रेयॉन घेतला आणि आकाशाच्या दिशेने एक रेषा काढली. त्याने स्वतःला बर्फाच्या एका टेकडीच्या शिखरावर पाहिले.



तिथे हॅराल्डची पेंग्विन्सच्या एका गटाशी
भेट झाली. आपल्यालाही बर्फाच्या
टेकडीवरू घसरायला आवडेल असे
हेरॉल्डला वाटले.

ते एकामागोमाग एक आपल्या
पोटावर टेकडीवरून खाली घसरत होते.
त्याने एका स्लेजचे चित्र काढले.



अनेक पेंग्विनी हॅरोल्डच्या स्लेजमध्ये उडी मारली.
लवकरच ते स्लेजपासून वेगळे झाले.

मग एक अपघात झाला.
हॅरोल्ड आणि पेंग्विन बर्फामध्ये पडले.



हॅराल्ड बर्फाने झाकला गेला होता
त्याला थंडी वाजत होती.
त्याने आकाशात एक मोठा सूर्य काढला.




हॅराल्डला पुन्हा उबदार वाटू लागले.
त्याने एक जंगल काढले.



माकडं वेलीवर झुलत होती.
मला सुद्‌धा झोके घ्यावे वाटत आहे.
हेरॉल्डने विचार केला.

हॅरोल्डने एक वेल हाताने पकडली
आणि लवकरच तो माकडासारखे
मागेपुढे झोके घेऊ लागला..



प्राण्यांसारखे आयुष्य जगणे मजेशीर होते.
पण हॅराल्डला स्वतःसारखेच राहायला
सर्वात जास्त आवडते.

हॅराल्डने आपला जांभळा क्रेयॉन घेतला
आणि आपल्या बेडरूमची खिडकी काढली.



आपल्या खोलीत परतल्यावर हॅराल्डने पांघरूण अंगावर ओढून घेतले आणि आपल्या खेळण्यातले कुत्रे ‘लिलाक’ ला कुशीत घेतले.. त्याच्या हातातील जांभळ्या रंगाचा खडू खाली पडला आणि हॅराल्डला झोप लागली.

हॅरोल्ड त्याच्या आईला वाढदिवसाला काय भेटवस्तू देणार आहे?



समाप्त